CMYK

'भेटला विठ्ठल माझा!' डॉ. हुशे दांपत्याच्या हस्ते श्री क्षेत्र वैष्णवगड येथे महापूजा! >> पान 2

विठुरायाच्या कृपेने संकल्प सिद्धी डॉ. नीलम गोऱ्हे यांच्याकडून आभार प्रदर्शन >> पान 3

सर्वांना निरोगी आयुष्य दे...बळीराजासाठी चांगला पाऊस पडु दे.. >> पान 4


# दैनिक आपला विदर्भ

**सुविचार**
जीवनात प्रेम आणि सौहार्द वाढवा.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 295 ■ सोमवार, दि. 07 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





रणवीर सिंगचा 'धुरंधर' लूक, छावानंतर अक्षय खन्नाच्या नव्या सिनेमातील भूमिकेने वेधलं लक्ष — आतील पान

# हरिनामाच्या गजराने दुमदुमली श्री विठ्ठलाची पंढरी
# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शासकीय महापूजा

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** आषाढी एकादशी या दिवशीची शासकीय महापूजा राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्याची परंपरा आहे. त्यानुसार ६ जुलै रोजी पंढरपूरची शासकीय महापूजा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्या हस्ते संपन्न झाली. शासकीय महापूजेचा मान नाशिक जिल्ह्यातील कैलास दामू उगले वय ५२ आणि कल्पना कैलास उगले या शेतकरी दाम्पत्याला मिळाला आहे. उगले हे जातेगाव ता. नांदगाव जिल्हा नाशिक येथील रहिवासी आहेत. गेली १२ वर्षे ते विठ्ठलाची वारी करत आहेत. कैलास उगले यांचे वडील सेवानिवृत्त सैनिक आहेत. आज पहाटे २ वाजून २० मिनिटांनी श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा राज्याचे मुख्यमंत्री आणि मानाचे वारकरी यांच्या हस्ते संपन्न झाली.

## राज्यभरातून २० लाख भाविक पंढरपुरात दाखल झाल्याचा अंदाज

पंढरपुरात आषाढी एकादशीच्या मोठा सोहळा : पंढरपूरमध्ये ६ जुलै रोजी देवयानी एकादशी म्हणजे आषाढी एकादशीच्या मोठा सोहळा लाखो भाविकांच्या उपस्थितीमध्ये आज पार पडत आहे. आषाढी एकादशी सोहळ्याची शासकीय महापूजा राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होत असते. त्याचवेळी पदस्पर्श दर्शन रांगेतील भाविकांनाही शासकीय महापूजेचा मान मिळत असतो. शासकीय महापूजेचा मान मिळालेल्या वारकऱ्यांना एसटी महामंडळातर्फे वर्षभर मोफत प्रवास दिला जातो. यंदाची आषाढी एकादशी विक्रमी होण्याची शक्यता प्रशासनाकडून वर्तवण्यात येत आहे. या आषाढी एकादशीसाठी राज्यभरातून >> पान २



## महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी

दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** शासकीय महापूजेच्या निमित्ताने पंढपूरमध्ये असलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील शेतकऱ्यांना एक आनंदाची बातमी दिली आहे. राज्यातील शेती आधुनिक आणि अधिक उत्पादक व्हावी तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे यासाठी महायुती सरकारने पुढाकार घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकार शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे यासाठी दरवर्षी पाच हजार कोटी या पद्धतीने पाच वर्षात पंचवीस हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे.

ठिबक संच, कृषी यांत्रिकीकरण, शेततळे, सिंचनासाठी पंप अशा विविध योजना राबवून शेतीचे आधुनिकीकरण केले जाईल. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे यासाठी प्रयत्न केला जाईल. ही माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंढरपूर येथे बोलताना दिली.

शेतकऱ्यांना उत्पादन वाढीसाठी >> पान २

## बाळासाहेबांच्या काळातही ७० - ७४ आमदार निवडून यायचे : आ. संजय गायकवाड

दैनिक आपला विदर्भ

**लातूर/प्रतिनिधी :** ठराविक प्रसारमाध्यमांकडून ठाकरे ब्रँडची चर्चा घडवून आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पण ठाकरे नावाचा ब्रँड असता तर बाळासाहेब ठाकरे यांच्या काळात २८८ आमदार निवडून यायला हवे होते. पण तेव्हाही ७० - ७४ आमदार निवडून यायचे, असे बुलढाण्याचे शिवसेना आमदार संजय गायकवाड म्हणाले.

सध्याच्या राजकारणात नेता जनतेशी किती जोडलेला आहे हे म हत्त्वाचे आहे. जनतेची किती कामं करतो हे पण महत्त्वाचं आहे; असेही बुलढाण्याचे शिवसेना आमदार संजय गायकवाड म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेब ठाकरे यांचा मूळ विचार सोडून दिला. राज ठाकरे यांनीसुद्धा टाळीला टाळी द्यायला फार उशीर केला आहे. त्यामुळे आता या एकत्र येण्याचा महाराष्ट्राच्या राजकारणावर काही ठोस परिणाम होईल, असं वाटत नाही; असे आम दार संजय गायकवाड यांनी सांगितले. शनिवारी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंनी सभा घेतली. या सभेच्या पार्श्वभूमीवर आमदार संजय गायकवाड यांनी प्रतिक्रिया दिली.

## पांडुरंगा मुख्यमंत्र्यांच्या डोक्यात जा, त्यांच्या मुखातून कर्जमाफीची तारीख जाहीर कर

### बच्चू कडूंचं विठुरायाला साकडं

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी शेतकरी, शेतमजूर तसेच दिव्यांगांच्या मागण्यासाठी गेल्या महिन्यात आठवडाभर अन्नत्याग आंदोलन केले होते. सरकारच्या आश्वासनानंतर त्यांनी आंदोलन तात्पुरते स्थगित केले असले तरी, ते अद्याप आपल्या आंदोलनाच्या भूमिकेवर ठाम आहेत. दरम्यान, आषाढी एकादशीनिमित्त बच्चू कडू यांनी पांडुरंगा मुख्यमंत्र्यांच्या डोक्यात जा, त्यांच्या मुखातून कर्जमाफीची तारीख जाहीर कर, असं साकडं घातलं आहे.

बच्चू कडू म्हणाले की, मी पांडुरंगाला साकडं घालतो की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मनात शेकऱ्यांप्रती चांगला विचार येऊ दे. नेहमी शहरीकरणाचा मुद्दा ते धरतात. जपानच्या तंत्रज्ञानावर शहराचा विकास होतो आणि इकडे पांदण रस्ते शेतकऱ्यांना जाण्यासाठी नाही. त्यामुळे पांडुरंगा मुख्यमंत्र्यांच्या डोक्यात तू जा >> पान २

## मुसळधार पावसामुळे गोदावरी नदीला पुन्हा पूर

■ रामकुंड परिसरातील अनेक मंदिरं पाण्याखाली

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिक जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू असल्यानं गंगापूर धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. परिणामी गोदावरी नदीला पूर आला असून रामकुंड परिसरातील अनेक लहान मोठी मंदिरं पाण्याखाली गेली आहेत. प्रशासनाच्या वतीनं गोदावरी नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नाशिकमधील दुतोंड्या मारुतीच्या कमरेच्यावर पाणी पोहोचलं आहे. त्यामुळे नागरिकांनी मोठी धास्ती घेतली आहे.



नाशिक जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू असून >> पान २

## हिमाचलमध्ये निसर्गाचा प्रकोप सुरुच; प्रलयकारी पावसात पाच पूल वाहून गेले, १५ दिवसांत ७५ जणांचा मृत्यू, ३१ अजूनही बेपत्ता

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** हिमाचल प्रदेशात अवघ्या दोन आठवड्यात मान्सूनने प्रचंड उद्ध्वस्त केले आहे. मुसळधार पाऊस, भूस्खलन आणि ढगफुटीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रम णात लोकांचा मृत्यू झाला आहे आणि अनेक जण बेपत्ता असल्याची माहिती आहे. ढगफुटीनंतर अचानक आलेल्या पुरामुळे झालेल्या मोठ्या विध्वंसातून हिमाचल प्रदेश सावरू शकलेले नाही. दरम्यान, हवामान




खात्याने जारी केलेल्या अलर्टमुळे लोक घाबरले आहेत. हवामान खात्याने ६ जुलै दुपारी ते ७ जुलै दरम्यान मंडी, कांगडा, सिरमौर येथे मुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. हा अलर्ट आपत्तीग्रस्त लोकांच्या जखमांवर मीठ चोळण्यासारखा आहे.

हवामान खात्याने चंबा, कांगडा, मंडी आणि सिरमौर येथेही अचानक आलेल्या पुराचा अलर्ट जारी केला आहे. हवामान खात्याने ८ जुलैपर्यंत राज्यातील अनेक भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. सरकारी प्रशासनाने लोकांना सतर्क राहण्याचा सल्ला दिला आहे. >> पान २

## चोर सोडून संन्याशाला फाशी! मुलाच्या गुन्ह्यासाठी बापाला त्रास, पोलिसाच्या छळामुळे वडिलांनी संपवलं

**धाराशिव/प्रतिनिधी :** धाराशिव तालुक्यातील वाघोली गावात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. इथं एका व्यक्तीने पोलिसांनी दिलेल्या त्रासातून आत्महत्या केली आहे. मुलाने केलेल्या एका गुन्ह्यासाठी पोलिसांनी पीडित व्यक्तीला पोलीस ठाण्यात बोलावून चौकशी केली. यावेळी पोलिसांनी शिवीगाळ करत अपमानास्पद वागणूक दिली. यामुळे अस्वस्थ झालेल्या व्यक्तीने गळफास घेऊन आयुष्याचा शेवट केला आहे.

काकासाहेब खडके असं आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीचं नाव आहे. त्यांचा मुलगा धीरज काकासाहेब खोडके हा एका चेन स्नॅचिंग प्रकरणातील आरोपी आहे. काही दिवसांपूर्वी सोलापूर जिल्ह्यातील >> पान २

## सावकाराच्या तुकड्यांवर जगणारे दोनचार सोडले तर प्रत्येकाला आनंद; ठाकरे बंधूंच्या एकीवर साहित्यिक अरविंद जगताप यांची पोस्ट

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि ठाकरेंच्या शिवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे शनिवारी (५ जुलै) रोजी २० वर्षांनी एकत्र आलेले पाहायला मिळाले. दोन्ही नेते मराठी भाषेच्या मुद्द्यावर एकत्र आले. विशेष म्हणजे सरकारने हिंदी सक्तीचा निर्णय रद्द केल्यानंतर दोन्ही ठाकरे बंधूंनी यावेळी विजयी सभा घेतली. विशेष म्हणजे ठाकरे बंधूंनी एकत्र यावं, असं कित्येक लोकांनी यापूर्वी देखील बोलून दाखवलं होतं. हा क्षण पाहाण्यासाठी महाराष्ट्रातील जनतेला २० वर्षे वाट पाहावी लागली. दरम्यान, ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्यावर साहित्यिक अरविंद जगताप यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अरविंद जगताप त्यांच्या पोस्टम ध्ये लिहितात, भाऊ वेगळे झाले की शेताचा बांध तुटतो. भाऊ एक झाले की अश्रूंचा बांध फुटतो. भाऊ एक झाले की >> पान २

## वडाळ्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी केली सपत्नीक विठ्ठलाची पूजा, बळीराजाच्या कल्याणासाठी घातलं साकडं

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** वडाळा येथील विठ्ठल रखुमाई मंदिराचा विकास, सुशोभीकरण आणि सोयी सुविधांच्या कामासाठी २५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते. त्यानुसार आता या प्राचीन मंदिराचा विकास आणि सुशोभीकरण कामाला सुरुवात करण्यात येईल, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केलं. त्यांनी आज (६ जुलै) आषाढी एकादशीच्या शुभ मुहूर्तावर वडाळा येथील विठ्ठल मंदिरात जाऊन सपत्नीक विठुरायाची पूजा केली, तेव्हा ते बोलत होते.

वडाळ्यातील विठ्ठल रखुमाईचं मंदिर हे १६ व्या शतकातील : वडाळ्यातील विठ्ठल रखुमाईचं मंदिर हे १६ व्या शतकातील असून, प्रतिपंढरपूर अशी त्याची ओळख आहे. संत तुकाराम महाराजांच्या हस्ते या देवळात विठ्ठल रखुमाईच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली होती. ज्या भाविकांना आषाढी एकादशीला पंढरपूरला जाणं शक्य होत नाही, ते इथं येऊन विठुरायाचं दर्शन घेतात. आषाढी वारीला पंढरपूर एवढाच उत्साह इथंही पाहायला मिळतो. आज या प्राचीन मंदिरात विठ्ठलाची पूजा करण्याचं सौभाग्य मिळाल्यानं उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी समाधान व्यक्त केलं.मंदिरात अभिषेक आणि आरती केल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी राज्यातील नागरिकांच्या आयुष्यात सुख, समाधान, आनंद यावा, बळीराजाच्या आयुष्यात चांगले दिवस यावेत, समाधानकारक पाऊस पडावा, अशी प्रार्थना विठ्ठल चरणी केल्याचं उपमुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

सोबतच आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात या मंदिराला २५ कोटी रुपयांचा निधी दिला होता. त्यानुसार



मंदिर समितीकडून विकास आराखडा तयार करण्याचं काम सुरू असून, ते पूर्ण झाल्यानंतर या परिसराचं सुशोभीकरण आणि अन्य कामांना प्रत्यक्ष सुरुवात होईल, असंही उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं. ''या मंदिरासोबतच इथं अन्य देवांची मंदिरं आहेत, त्यामुळे सर्व देवतांचे पावित्र्य राखून सुनियोजित काम केलं जाईल'', असंही त्यांनी सांगितलं.

यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या पत्नी लता शिंदे, आमदार कालिदास कोळंबकर, आमदार प्रसाद लाड, आमदार प्रा. मनीषा कायंदे, शिवसेना प्रवक्त्या शीतल म्हात्रे, शिवसेनेचे प्रवक्ते राजू वाघमारे, माजी नगरसेवक अमेय घोले आणि महायुतीचे सर्व प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## पनवेल–कल्याण रेल्वे दिवामार्गे करण्याची गरज

दैनिक आपला विदर्भ

**डोंबिवली/प्रतिनिधी :** पेण–पनवेल–कल्याण रेल्वे दिवा मार्गे सुरू करण्याची नितांत गरज आहे. ही सेवा सुरू केल्यानंतर लाखो प्रवाशांचा वेळ वाचेल तसेच मेन लाईनवरील ताण कमी होण्यास मदत होईल. कल्याण टिटवाळा अंबरनाथ येथूनच्या पट्ट्यांतून असंख्य प्रवाशी पनवेलच्या दिशेला जाणारे आहेत. त्यांना ठाणे मार्गे प्रवास करावा लागतो. सदर सेवा सुरू केली तर प्रवाशांचा प्रवास सुखकर होईल. या मागणीला विविध प्रवाशी संघटनांनी संमती दिली असून ती पूर्ण व्हावी अशी प्रवाशी संघटने बरोबरच या पट्यांतील नागरिकांची देखील मागणी आहे. कल्याण–डोंबवली बससेवा असली तरी ती अनियमित असते. कल्याण पनवेल प्रवास पाऊण तासाचा होईल सध्या या प्रवासाला तास–दीडतास वेळेपेक्षा जास्त वेळ व गाड्या बदलण्यासाठी त्रासही वाचेल.

CMYK

## उत्पादनावर लक्ष केंद्रित करावे

'विकसित भारता'चे स्वप्न साकार करण्यासाठी केंद्र सरकारने 'राष्ट्रीय उत्पादन अभियान' हाती घेतले आहे. हे अभियान केवळ एक सरकारी घोषणा नसून, जगाचे उत्पादन केंद्र म्हणून भारताची ओळख प्रस्थापित करण्यासाठीचा हा उपक्रम आहे. चीनला समर्थ पर्याय म्हणून भारताला पुढे यायचे असेल, तर त्याला उत्पादनावर लक्ष केंद्रित करावेच लागणार आहे. २०४७ मधील 'विकसित भारता'चे स्वप्न साकार करण्यासाठी केंद्र सरकारने उचललेले एक निर्णायक पाऊल म्हणजे 'राष्ट्रीय उत्पादन अभियान' होय. जून महिन्यात हे अभियान औपचारिकपणे सुरू होणार असल्याचे, नीति आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. आर. सुब्रह्मण्यम यांनी नुकतेच जाहीर केले. यापूर्वी २०२५-२६ सालच्या केंद्रीय अर्थसंकल्पात या अभियानाची घोषणा करण्यात आली होती. उत्पादन क्षेत्राचे सकल देशांतर्गत उत्पन्नात (जीडीपी) २०४७ सालापर्यंत २५ टक्क्यांपर्यंत योगदान नेण्याचा केंद्र सरकारचा निर्धार असून, हे लक्ष्य साध्य करण्यासाठी वार्षिक १५ टक्के वाढ साधणे अपेक्षित आहे. भारताची ओळख जगातील सर्वांत मोठ्या लोकसंख्येचे, युवा लोकसंख्या असलेले राष्ट्र अशीच आहे. तथापि, उत्पादन क्षेत्राचा देशातील जीडीपीमधील वाटा सध्या केवळ १६-१७ टक्के इतकाच आहे. भारताने 'सेवा प्रधान अर्थव्यवस्था' म्हणून प्रगती केली असली, तरी आता उत्पादन क्षेत्राला बळ देऊन भारताला उत्पादनाचे जागतिक केंद्र व्हायचे आहे. त्यासाठीच, 'राष्ट्रीय उत्पादन अभियान'ची संकल्पना विकसित करण्यात आली आहे. नीति आयोगाच्या म्हणण्यानुसार, या अभियानाचा उद्देश २०४७ सालापर्यंत भारताला ७.५ ट्रिलियन डॉलर्सच्या अर्थव्यवस्थेच्या दिशेने नेणे हा आहे. त्यासाठी तंत्रज्ञानाची उपलब्धता व नवनिर्माण, कौशल्य विकास आणि संरचनात्मकता या तीन महत्त्वाच्या बाबींवर भर दिला जाणार आहे. या त्रिसूत्रीवर आधारित योजनांच्या अंमलबजावणीद्वारेच, भारत उत्पादनाचे जागतिक केंद्र म्हणून पुढे येऊ शकतो. या अभियानाच्या कार्यवाहीसाठी मूलभूत रणनीती निश्चित झाली आहे. यात, उत्पादन खर्च कमी करणे व व्यापारसुलभता वाढवणे याचा समावेश आहे. उद्योगांसाठी 'इझ ऑफ डुइंग बिझनेस' सुधारून, अनावश्यक परवाने, मंजुरी प्रक्रिया, लालफीतीचा कारभार कमी करणे, यांचा अवलंब करावा लागेल. तसेच, कौशल्ययुक्त मनुष्यबळ भारताला तयार करावे लागेल. 'स्किल पासपोर्ट' योजनेद्वारे प्रत्येकाच्या कौशल्याचा डेटाबेस तयार करून, रोजगार मिळवण्यास मदत केली जाईल. याचबरोबर, 'एमएसएमई' क्षेत्राला जागतिक मूल्यसाखळीत समावेश करण्यासाठी विशेष धोरण आखावे लागेल. उत्पादन क्षेत्रासाठी आवश्यक उपकरणे, यंत्रसामग्री देशात विकसित होण्यासाठी संशोधन व विकासात गुंतवणूक करण्याची गरज आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचा विचार करता, देशांतर्गत उत्पादित वस्तूंच्या गुणवत्तेचा स्तरही उंचवावा लागेल. 'मेक इन इंडिया' या अभियानातूनच 'क्वालिटी इन इंडिया' याकडेही लक्ष केंद्रित करावे लागेल. या अभियानात हरित तंत्रज्ञान आणि स्वच्छ ऊर्जा साधनांवर विशेष भर असणार आहे. त्यासाठी सौर व पवन आधारित ऊर्जा उपकरणे, इलेक्ट्रिक वाहनांच्या बॅटरी, मोटर्स, नियंत्रण यंत्रणा, हाय व्होल्टेज ट्रान्समिशन उपकरणे, ग्रीन हायड्रोजनसाठी इलेक्ट्रोलायझर्स, ग्रिड स्केल बॅटरी स्टोरेज संबंधित उत्पादने आणि क्षेत्रे या अभियानाच्या केंद्रस्थानी असतील. ही साधने फक्त भारताच्या 'नेट झिरो' कार्बन उत्सर्जनाच्या उद्दिष्टाला पूरक ठरणार असे नाही, तर जागतिक निर्यातक्षम उत्पादनांमध्येही भारताचे स्थान अधिक बळकट करणारी ठरतील. यातील स्किल पासपोर्ट हा फार महत्त्वाचा आहे. यामध्ये व्यक्तीच्या व्यावसायिक कौशल्यांची नोंद केली जाईल. कोणत्याही प्रदेशात किंवा कंपनीत रोजगाराच्या शोधात असणाऱ्या व्यक्तींसाठी, हे एक डिजिटल प्रमाणपत्रच असेल. यामुळे प्रशिक्षण आणि रोजगार यातील दरी भरून काढण्यास मोठीच मदत होणार आहे. 'औद्योगिक प्रशिक्षण संस्था' (आयटीआय) संबंधित उद्योग समूहांच्या ताब्यात देणे, अशीही एक कल्पना पुढे येत आहे. यामुळे प्रत्यक्ष औद्योगिक गरजांनुसार प्रशिक्षणाची आखणी करणे शक्य होईल. त्यातूनच, शिक्षण आणि उत्पादन यामध्ये समन्वय साधता येईल. याद्वारे स्थानिक मनुष्यबळ अधिक रोजगारक्षम ठरेल. या अभियानासाठी एक स्वतंत्र, कार्यक्षम आणि धोरणात्मक अधिकार असलेली संस्था स्थापन केली जाणार असून, ती विविध मंत्रालयांमध्ये समन्वय साधण्याचे काम तर करेलच, त्याचबरोबर गुंतवणूकदारांशीही संवाद साधून धोरणांची अंमलबजावणी सुनिश्चित करेल. सध्या बहुराष्ट्रीय कंपन्या चीनमधून बाहेर पडण्यासाठी पर्यायी उत्पादन साखळ्यांच्या शोधात आहेत. 'चीन +१' धोरणामध्ये भारत हा सक्षम पर्याय म्हणून समोर येतो आहे. यासाठी भारतीय उद्योजकांनी आपली प्रगत लोकसंख्या, वाजवी उत्पादन खर्च, सरकारचे धोरण सातत्य, राजकीय स्थिरता यांचा लाभ घेणे नितांत गरजेचे. राष्ट्रीय उत्पादन अभियान हे केवळ एक सरकारी धोरण नसून, ती भारताच्या औद्योगिक पुनर्जागरणाची घोषणा आहे. हे अभियान देशात औद्योगिक क्रांती घडवून आणण्याची क्षमता ठेवते. चीनच्या 'मेड इन चायना' प्रमाणेच, हे भारताचे 'मेक इन इंडिया' अभियान आहे. २१व्या शतकाच्या मध्यास भारत हा जागतिक उत्पादनाचा केंद्रबिंदू होऊ शकतो आणि या योजनेमुळे त्याची सुनिश्चिती होण्यास मदत होणार आहे, हे नक्की. भारत ही जगातील सर्वांत मोठी बाजारपेठ असली, तरी आज भारत अनेक लहान व विकसनशील देशांचा विश्वासू उत्पादन भागीदारही बनला आहे. शेतीची अवजारे, जनावरांची औषधे, स्वस्त तरीही दर्जेदार औद्योगिक यंत्रे, फार्मास्युटिकल्स या क्षेत्रांमध्ये भारत मोठा निर्यातदार आहे. त्यामुळेच भारताच्या परराष्ट्र धोरणात या उत्पादन निर्यातीला विशेष स्थान आहे. ही आर्थिक घडी केवळ व्यापारापुरती मर्यादित राहिलेली नसून, विश्वासाच्या सहकार्याचे रूप तिने घेतले आहे. राष्ट्रीय उत्पादन अभियानाच्या माध्यमातून आता ही क्षमता अधिक बळकट करण्याची संधी निर्माण झाली आहे. मात्र, हे करताना काही मूलभूत अडचणींवर मात करणेही अत्यावश्यक आहे. उदाहरणार्थ, उत्पादन क्षेत्रात गुंतलेल्या अनेक लघु उद्योजकांच्या मते, उत्पादनानंतर लागणारी गुणवत्ता प्रमाणपत्रे मिळवण्याची प्रक्रिया अत्यंत संथ आणि क्लिष्ट आहे. बाबूशाही, परवान्यांची गुंतागुंत आणि त्यामुळे होणारा विलंब उत्पादकांचा वेळ, पैसा आणि मनोबल यांचे मोठेच नुकसान होते. परिणामी उत्पादकांमध्ये निराशा आणि नकारात्मकतेचे वातावरण निर्माण होते. या संथ प्रक्रियांमध्ये आमूलाग्र सुधारणा करून, प्रमाणपत्रांचा कालावधी लक्षणीयरित्या कमी करणे ही काळाची गरज आहे.

# 'भेटला विठ्ठल माझा!' डॉ. हुशे दांपत्याच्या हस्ते

# श्री क्षेत्र वैष्णवगड येथे महापूजा!

### विदर्भातील प्रती पंढरपूर वैष्णवगडावर आषाढी एकादशीनिमित्त भाविकांचा महासागर; मोफत आरोग्य तपासणी, औषध वाटप व शिस्तबद्ध दर्शन व्यवस्थेने भाविकांमध्ये समाधान!

**दैनिक आपला विदर्भ**

**■ देवानंद सानप**






**बिबी :** बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा तालुक्यात वसलेले श्री क्षेत्र वैष्णवगड, जे विदर्भातील प्रती पंढरपूर म्हणून ओळखले जाते, येथे यावर्षीच्या आषाढी एकादशीनिमित्त लाखो भाविकांनी श्री विठ्ठल-रखुमाईचे दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती. गडावर पहाटे ४ वाजता महापूजेला प्रारंभ झाला. या पूजेसाठी वैद्यकीय क्षेत्रातील प्रसिद्ध दांपत्य डॉ. प्रदीप हुशे (हृदयरोग तज्ज्ञ) व डॉ. सौ. अंजली हुशे (महिलारोग तज्ज्ञ) रा. निमगाव वायाळ हे प्रमुख पूजाविधीला उपस्थित होते.

"भेटला विठ्ठल माझा!" या भक्तिभावाने ओतप्रोत वातावरणात, गडावर टाळ-मृदंगाचा गजर, हरिपाठाचे सूर, आणि हजारोंच्या मुखातून विठ्ठलनामाचा जयघोष झाला. महापूजेदरम्यान डॉ. उमेशचंद्र हुशे (सहाय्यक उपनिबंधक), डॉ. राजेंद्र हुशे, खुशालराव नागरे, डॉ. शिवानंद जायभाये, डॉ. विलास खुरपे, संजय सांगळे हे मान्यवर उपस्थित होते.

तालुक्यातील डिग्रस, निमगाव वायाळ, हिवरखेड पूर्णा, राहेरी, बारलिंगा, पळसखेड, चक्का, जळगाव पिंपळगाव, साठेगाव, वाघजाई आदी गावांमधून निघालेल्या शेकडो दिंड्यांनी वैष्णवगड गडावर आगमन केले. रामेश्वर मंदिर संस्थान, सिंदखेडराजा यांच्या दिंडीने शहरातून मिरवणूक काढत संत सावता महाराज मंदिराजवळ पारंपरिक रिंगण सोहळा पार पाडला. भाविकांची सेवा म्हणजेच श्रीची सेवा मानत, भाविकांची आरोग्य तपासणी केली व गरजूंना औषधे वाटली. ही सेवा प्राथमिक आरोग्य केंद्र आडगाव राजा यांच्या सहकार्याने राबवण्यात आली. या सेवेत पुढील कर्मचारी सहभागी होते: वैद्यकीय अधिकारी: डॉ. शिपे आरोग्य सेवक/सेविका: विवेक मुंढे, संतोष वाघ, संगीता वनवे, अश्विनी गवई, अनुराधा काकडे वाहन चालक: अंबादास हरकळ, तायडे, नारायण बांगर तर आपत्कालीन १०८ वाहन कर्मचारी: डॉ. संजय झोटे, चालक रामेश्वर दराडे, विलास केकान या उपक्रमामुळे भाविकांनी समाधान व्यक्त केले असून, या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

भाविकांची संख्या पाहता पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. उपविभागीय पोलीस अधिकारी मनिषा कदम, ठाणेदार आशिष इंगळे, निरीक्षक तुषार जाधव, पीएसआय बालाजी सानप, गोपनीय विभागाचे श्रावण डोगरे यांनी मार्गदर्शनाखाली स्थानिक पोलीसांनी भाविकांना योग्य सूचना दिल्या: दागिने सांभाळणे लहान मुलांवर लक्ष ठेवणे वाहनांमध्ये योग्य अंतर ठेवणे दुकान, खेळण्यांचे स्टॉल रस्त्यावर न लावणे गर्दी नियंत्रणासाठी पर्यायी मार्गांचा वापर वैष्णवगड समितीच्या वतीने भाविकांना मोफत फराळ व चहा वाटप करण्यात आला. दर्शनासाठी मंदिर व्यवस्थापनाने स्वयंसेवकांची नेमणूक केली होती. टोकापासून दर्शन मिळेपर्यंत रांगा असतानाही, भक्तिपूर्ण वातावरणात कोणीही नाराजी व्यक्त केली नाही. श्री क्षेत्र वैष्णवगड आजच्या दिवशी केवळ दर्शनाचे ठिकाण न राहता, भक्ती, समाजसेवा आणि संघटित व्यवस्थापनाचे केंद्र ठरले. डॉ. हुशे दांपत्याने "सेवा हीच श्रीची पूजा" हे तत्त्व मूर्त स्वरूपात उतरवत आपल्या कार्यातून श्रद्धेला विज्ञानाची जोड दिली. "सामाजिक बांधिलकी, अध्यात्मिक श्रद्धा आणि शिस्तबद्ध नियोजन अशा त्रिसूत्रीवर आधारित हा उत्सव भाविकांच्या मनात कायमचा कोरला गेला आहे."

पान १ वरुन...

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते

सुमारे २० लाख भाविक दाखल झाल्याचा अंदाज प्रशासनाकडून वर्तवण्यात येत आहे. विठ्ठल रुक्मिणी पदस्पर्श दर्शन रांग गोपाळपूरच्या पुढं गेली आहे. यंदाच्या वारीसाठी नवमीपासूनच पदस्पर्श दर्शन रांगेमध्ये मोठी गर्दी झाली होती. पदस्पर्श दर्शन रांगेसाठी प्रशासनाच्या वतीनं तसेच विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीनं सर्व सोयी देण्यात आल्या आहेत. यामध्ये घुसखोरी रोखण्यासाठी मंदिर समितीनं प्रयत्न केले. पदस्पर्श रांगेतील वारकऱ्यांना मोफत चहा, पाणी, यांची सोय करण्यात आली आहे.

## महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी

आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करता यावा, म्हणून राज्य शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. शेतकऱ्यांना बाजारपेठांशी थेट जोडणाऱ्या योजनाही बाजार समित्यांच्या माध्यमातून राबविल्या जात आहेत. त्यामुळे शेतमालाला योग्य भाव मिळण्यास मदत होत आहे. गावातील विकास सहकारी संस्थांना बहुउद्देशीय संस्थांमध्ये रूपांतरित करण्याची योजना केंद्र सरकारने तयार केली आहे. या संस्थांना एकूण अठरा प्रकारच्या व्यवसायांची परवानगी दिली जाणार आहे.

## पांडुरंगा मुख्यमंत्र्यांच्या

आणि त्यांच्या कानात कर्जमाफीसंदर्भात सांग. कर्ज माफीची तारीख जाहीर केली पाहिजे. त्यांच्या मुखातून कर्जमाफीची तारीख जाहीर कर, असे त्यांनी म्हटले.

बच्चू कडू पुढे म्हणाले की, सरकार शेतकऱ्यांसाठी कुठे मर्दानगी दाखवत नसून हे नामर्दांचे सरकार आहे. शेतकऱ्यांसाठी ५६ इंचाची छाती दिसली पाहिजे. राम मंदिरात जे भाजपला पुण्य भेटलं. ते यांची सत्ता आल्यानंतर शेतकऱ्यांच्या १२०० आत्महत्येचं पाप कुठे हे फेडणार? त्यांच्या धोरणामुळेच शेतकरी मरत आहेत, असा हल्लाबोल देखील त्यांनी यावेळी केला.

जोपर्यंत कर्जमाफीची तारीख निश्चित होत नाही, तोपर्यंत आमचं आंदोलन कायम राहणार आहेत. येत्या दोन ऑक्टोबरला मुंबईत मोठा मोर्चा सुद्धा या विषयावर काढण्यात येणार आहे. ऐन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या वेळेवर भाजपने हिंदी सक्तीचा मुद्दा घेतला हीच तर भाजपची हुशारी आहे, असे देखील बच्चू कडू म्हणाले. दरम्यान, शासनाच्या धोरणामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. त्यामुळे घरावरील सोन्याचे कौल बसवण्यापेक्षा धोरण बदलले तर शेतकरी आत्महत्या करणार नाही. शेतकऱ्यांना कर्ज भरण्यासाठी त्यांना सक्षम करण्याची गरज आहे, असेही ते म्हणाले

## मुसळधार पावसामुळे

यामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. नाशिक शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या गंगापूर धरणातून आज सकाळी १० वाजेपासून गोदावरी नदीत ५१८६ क्यूसेक पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. तसेच शहरातील इतरत्र भागातून गोदावरी नदीत मिळणाऱ्या पाण्यामुळे नदीच्या पाण्याची पातळी वाढली आहे. त्यामुळे गोदावरी नदीला दुसरा पूर आला आहे.

गंगापूर धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवल्यानं रामकुंड परिसरात असलेले अनेक छोटे-मोठे मंदिरं देखील पाण्याखाली गेली आहेत. दुतोंड्या मारुतीच्या छातीपर्यंत पाणी आलं आहे. या भागात असलेल्या टपऱ्या, भाजी विक्रेते यांना हटवण्यात आलं आहे. नदीप्रवाहात कोणीही जावू नये, तसेच नदीकाठ लगतच्या शेतकऱ्यांनी आपलं पशुधन, मोटार पंप सुरक्षित स्थळी हलवण्यात यावे असावा जिल्हा प्रशासनाच्या वतीनं आवाहन करण्यात आलं आहे.

गंगापूर धरणातून ५१८६ हजार क्युसेक, तसेच जिल्ह्यातील दारणा, नांदूरमध्यमेश्वर, कडवा, कादवा, पालखेड धरणातून कमी जास्त प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरु आहे. यामुळे नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

गोदावरी नदीला पाणी वाढल्यानं रामकुंड पाण्याखाली आहे. मूळ रामकुंडाच्यावर १५ फूट पाणी आहे. त्यामुळे गोदावरी नदीच्या काठावर इतरत्र विधी होत आहेत. पाणी वाढल्यानं आम्ही अस्थी विसर्जन, धार्मिक विधीसाठी येणाऱ्या नागरिकांना पाण्यात उतरू नये, स्वतःच्या जवळच्या वस्तूंची काळजी घ्यावी, अशा सूचना प्रशासन देत आहे. पावसाचा जोर कमी झाला आणि गंगापूर धरणातून पाण्याचा विसर्ग बंद झाल्यावर पुन्हा मूळ जागेवर अस्थी विसर्जन होतील, असं पुरोहित सतीश शुक्ल यांनी सांगितलं.

रामकुंडात अस्थी विसर्जनाला विशेष महत्त्व आहे. गोदावरीच्या तीर्थावर अस्थी विसर्जन केल्यास त्याला मोक्ष प्राप्त होतो आणि परमेश्वराच्या धामामध्ये त्यांना शांती मिळते अशी आख्यायिका आहे. त्याचबरोबर साडेतीन तासांमध्ये या ठिकाणी अस्थींचं पाणी होते. प्रभू रामचंद्र १४ वर्षाच्या वनवासामध्ये अनेक वर्ष नाशिक वास्तव्यास होते. त्यामुळे प्रभू रामचंद्र यांनी इथं स्नान दान पूजा केली आहे. तसेच या ठिकाणी सिंहस्थ कुंभळ्याचं पवित्र स्थान होते. हे सर्वात प्राचीन तीर्थक्षेत्र असल्यामुळे या ठिकाणी देशभरातून हजारो भाविक घेत असतात.

## हिमाचलमध्ये निसर्गाचा

हिमाचलमध्ये पाऊस आणि भूस्खलनामुळे मोठे नुकसान

हिमाचलमध्ये मान्सूनमुळे आतापर्यंत ७२ जणांचा मृत्यू झाला आहे. ११३ जण जखमी झाले आहेत तर ३७ जण अजूनही बेपत्ता आहेत. मुख्यमंत्री राज्यात ७०० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा करत असले तरी, आपत्ती व्यवस्थापनाने ५४१ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा आकडा दिला आहे. राज्यात २६१ रस्ते बंद आहेत. ३०० ट्रान्सफॉर्मर बंद आहेत. २८१ पिण्याच्या पाण्याच्या योजनांचा पाणीपुरवठा खंडित झाला आहे. ५२१ प्राणी आणि पक्षी वाहून गेले आहेत, १९ घरे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत, ८२ घरांचे नुकसान झाले आहे, २०५ जनावरांचे गोठे वाहून गेले आहेत.

मंडीमध्ये सर्वाधिक नुकसान झाले आहे जिथे १५ जणांचा मृत्यू झाला आहे, अनेक लोकांचा शोध सुरू आहे. मंडीमध्ये १७६ रस्ते बंद आहेत. कुल्लूमध्ये ३९, सिरमौरमध्ये १९, कांगडामध्ये १२० आणि शिमलामध्ये ६ रस्ते बंद आहेत. मंडीच्या सेराजमध्ये मदत आणि बचाव कार्यासाठी सैन्याला मैदानात उतरावे लागले.

दरम्यान, झारखंडमध्ये शनिवारी मुसळधार पाऊस पडला. रामगड जिल्ह्यातील महुआ टांगरी येथे सकाळी एक बेकायदेशीर कोळसा खाण कोसळली. यामध्ये ४ जणांचा मृत्यू झाला आणि ४ जण जखमी झाले. सोमवार सकाळपर्यंत राज्यात मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट आहे. मध्य प्रदेशात जोरदार पावसाची यंत्रणा सक्रिय असल्याने पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. मुसळधार पावसामुळे मंडला जिल्ह्यात नर्मदा नदीला पूर आला आहे. येथे, नरसिंहपूर ते होशंगाबादला जोडणारा राष्ट्रीय महामार्गावरील पूल कोसळला.आज बिहारमधील १८ जिल्ह्यांमध्ये पावसाचा यलो अलर्ट आहे. या जिल्ह्यांमध्ये हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. जोरदार वारेही वाहू शकतात. शनिवारी मुंगेरच्या अररिया येथे पाऊस पडला. सासाराममध्ये वीज पडून दोन महिलांचा मृत्यू झाला. तर एका महिलेला जबर दुखापत झाली.

## चोर सोडून संन्याशाला फाशी!

बार्शी पोलीस ठाण्यात चैन स्नॅचिंग प्रकरणी धीरज काकासाहेब खडकेसह अन्य एका आरोपीवर कलम ३०४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींनी एका अपंग महिलेच्या गळ्यातील चेन चोरून पळ काढला होता. ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली होती.

या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी आरोपींची ओळख पटवून गुन्हा दाखल केला होता. तेव्हा पासून पोलीस धीरजचा शोध घेत होते. पण त्याचा काहीच थांगपत्ता लागत नव्हता. या प्रकरणात धीरजचा शोध घेताना पोलिसांनी त्याचे वडील काकासाहेब खडके यांना चौकशीसाठी ताब्यात घेतलं. त्यांना दिवसभर पोलीस ठाण्यात चौकशी केली. चौकशीदरम्यान त्यांचा मोबाईल जप्त करण्यात आला. तसेच चौकशी करत असताना शिवीगाळ करत अपमानास्पद वागणूक देण्यात आली.

एवढंच नव्हे तर पोलीस काकासाहेब यांना घेऊन त्यांच्या विविध नातेवाईकांच्या घरी गेले आणि त्या ठिकाणी आरोपी धीरजचा शोध घेण्यात आला. मुलानं केलेल्या गुन्ह्यासाठी काकासाहेब यांना मिळालेल्या या वागणुकीतून व्यथित झालेल्या काकासाहेब यांनी रविवारी सकाळी गळफास घेऊन आत्महत्या केली. या बाबतचा आरोप मयताच्या कुटुंबीयांनी केला आहे. या सगळ्या प्रकरणामुळे बार्शी पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

## सावकाराच्या तुकड्यांवर

शहराला बळ येतं . गावाला तर येणारच. एक व्हायचं. गावात दोन भाऊ एकत्र आले की सावकाराच्या तुकड्यांवर जगणारे दोनचार सोडले तर प्रत्येकाला आनंद होतो. एकत्र येऊन बघा.महाराष्ट्र सरकारने प्राथमिक शिक्षणात सुरुवातीला हिंदी भाषा सक्ती केली होती. मात्र, चारीबाजूंनी विरोध झाल्यानंतर तो निर्णय मागे घेण्यात आला. त्यानंतर सरकारने सक्तीच्या जागी तिसरी भाषा शिकवण्याचा आग्रह धरण्यास सुरुवात केली. प्राथमिक शिक्षणात मराठी, इंग्रजी आणि नंतर कोणतीही तिसरी भाषा शिकवली जावी, असा अट्टाहास शासनाने केला होता. मात्र, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या शासन निर्णयाला कडाडून विरोध केला. त्यानंतर ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीने देखील सरकारच्या या निर्णयास विरोध करण्यास सुरुवात केली.

दरम्यान, सरकारने महाराष्ट्रातील नेत्यांचा विरोध डावलून त्रिभाषा सूत्र लागू करण्याचा विचार ठेवल्यानंतर राज ठाकरेंनी मोर्चा काढणार असल्याची घोषणा केली. त्यानंतर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे या मोर्चात एकत्र येणार हे देखील ठरलं. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्राथमिक शिक्षणात तिसरी भाषा घुसडण्याचा निर्णय मागे घेतला. तोपर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येणार असल्याची चर्चा सुरु झाली. मात्र, सरकारने निर्णय रद्द केल्यानंतर मोर्चा ऐवजी विजयी सभा घेण्याचं ठरलं आणि राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे तब्बल २० वर्षांनी एकत्र आलेले पाहायला मिळाले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### टेक्सासमध्ये आलेल्या महापूरात ५१ जणांचा मृत्यू, अनेकजण बेपत्ता

वॉशिंगटन: अमेरिकेतील टेक्सास राज्यात शुक्रवारी (दि.४) झालेल्या जोरदार पावसामुळे आलेल्या पुरात ५१ लोकांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ग्वाडालुपे नदीला पूर आल्यामुळे ही भीषण स्थिती निर्माण झाली.या मृतांमध्ये १५ लहान मुलांचाही सम ावेश आहे, तर अनेक लोक अजूनही बेपत्ता आहेत.

ग्वाडालुपे नदीच्या आजूबाजूच्या भागात जास्त पाऊस झाल्याने नदीची पातळी २९ फूटाने वाढली आणि आसपासच्या परिसरात पाणी पसरले.

कॅम्प मधील मुली बेपत्ता

या पुरामुळे 'कॅम्प मिस्टिक' या समर कॅम्पमध्ये असलेल्या २७ मुली बेपत्ता झाल्या आहेत. मृतांपैकी ८ जणांची ओळख अजून पटलेली नाही, त्यात तीन लहान मुलेही आहेत. सरकारकडून सांगण्यात आले आहे की, बचाव पथके वेगाने काम करत असून आतापर्यंत सुमारे ८५० लोकांना वाचवण्यात आले आहे.

टेक्सासचे राज्यपाल ग्रेग ॲबॉट यांनी सांगितले की, त्यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना आपत्ती जाहीर करण्याची विनंती केली आहे. या घोषणेमुळे केंद्र सरकारकडून पूरग्रस्तांना मदत मिळू शकते.

हवामान खात्याचा अंदाज गडबडला

अमेरिकेच्या गृह सुरक्षा मंत्री क्रिस्टी नोएम यांनी सांगितले की, ''हवामान खात्याने केवळ मध्यम पावसाचा इशारा दिला होता, पण इतकी मुसळधार व अतिवृष्टी होईल, याचा अंदाज वर्तवलेला नव्हता. त्यामुळे लोकांना वेळेत सावध करता आलं नाही.''यावर एनओएएया हवामान संस्थाचे माजी प्रम ुख रिक स्पिनराड यांनी म्हटले की, सरकारने हवामान विभागातील हजारो लोकांना कामावरून काढून टाकले आहे. त्यामुळे काही कार्यालयांत कर्मचारीच नाहीत. त्यामुळे वेळेवर पूराचा अंदाज देता न आल्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

### कौटुंबिक वादानंतर महिलेची हत्या; मृत महिलेच्या पतीला अटक

**मुंबई/प्रतिनिधी :** पत्नीशी झालेल्या वादातून ३२ वर्षीय आरोपीने त्याच्या पत्नीची हत्या केल्याची घटना दहिसर पश्चिम येथे घडली. याप्रकरणी एम एचबी पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली असून त्याच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पप्पू मानू राठोड (३२) असे अटक आरोपीचे नाव असून तो दहिसर पश्चिम येथील गणपत पाटील नगर परिसरातील रहिवासी आहे.

तो बिगारी काम करून चरितार्थ चालवतो. आरोपीचा त्याच्या पत्नीशी तीन दिवसांपासून वाद सुरू होता. त्यातून आरोपीने शनिवारी २७ वर्षीय पत्नीच्या डोक्यात ग्राइंडिंग मशीन मारले. त्यानंतर ओढणीने गळा आवळून तिची हत्या केली. घटनेनंतर आरोपी पप्पू राठोड हा स्वत: पोलीस ठाण्यात आला व घडलेली हकीकत पोलिसांना सांगितली.


पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पाहिले असता आरोपीची पत्नी बेशुद्धावस्थेत पडली होती. त्यानंतर पोलिसांनी तिला रुग्णालयात नेले. तेथील डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. याप्रकरणी एमएचबी पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून आरोपी राठोडला अटक केली आहे.

### ज्येष्ठाकडून रुग्णालयातील रिसेप्शनिस्ट तरुणीचा विनयभंग

**पुणे/प्रतिनिधी :** ज्येष्ठाकडून रूग्णालयातील कर्मचारी तरुणीचा विनयभंग करण्यात आल्याची घटना घडली. याप्रकरणी एका ज्येष्ठाविरुद्ध विश्रामबाग पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

याबाबत एका तरुणीने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी एका ७३ वर्षीय ज्येष्ठाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुणी मध्यभागातील एका खासगी रुग्णालयात रिसेप्शनिस्ट आहे. ३ जुलै रोजी ज्येष्ठ रुग्णालयात आला होता. त्या वेळी तरुणी एकटीच रुग्णालयात होती. तरुणी एकटी असल्याची संधी साधून ज्येष्ठाने तिच्याशी अश्लील वर्तन केले. ज्येष्ठाने अश्लील वर्तन केल्याने तरुणी घाबरली. ती क्लिनिकमधून बाहेर पळाली. त्यानंतर ज्येष्ठाने तिला गाठले. 'उद्या क्लिनिकमध्ये आहे का ?', अशी विचारणा केली. या घटनेनंतर घाबरलेल्या तरुणीने विश्रामबाग पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली.

तरुणीचा विनयभंग करणे, तसेच मानसिक त्रास दिल्याप्रकरणी ज्येष्ठाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी रुग्णालयाच्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण तपासले असून, पोलीस उपनिरीक्षक पाटील तपास करत आहेत.



# विठुरायाच्या कृपेने संकल्प सिद्धी डॉ. नीलम गोऱ्हे यांच्याकडून आभार प्रदर्शन

## पुणे– निवडुंगा विठोबा मंदिरात आषाढी एकादशीनिमित्त महापूजा, अभिषेक आणि महाआरती

दैनिक आपला विदर्भ

■ उदय नरे

**पुणे :** पुण्याच्या नाना पेठेतील निवडुंगा विठोबा मंदिरात आषाढी एकादशीनिमित्त शिवसेना नेत्या व राज्य विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते महापूजा, अभिषेक आणि महाआरती पार पडली. या दिवशी त्यांनी पांडुरंगाच्या चरणी देश व राज्यासाठी केलेल्या मागील वर्षीच्या संकल्पाच्या सिद्धतेबद्दल विठ्ठल-रुक्मिणी मातेस कृतज्ञता व्यक्त केली.

या धार्मिक विधींमध्ये डॉ. गोऱ्हे यांच्यासोबत ज्येष्ठ कार्यकर्त्या जेहलम ताई जोशी, मंदिराचे विश्वस्त आणि माजी नगरसेवक विशाल धनवडे, सामाजिक कार्यकर्त्या सुदर्शना त्रिगुणाईत, डॉ. गोऱ्हे यांची सून डॉ. सतलज आणि नात ईरा उपस्थित होत्या.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, ''मागील आषाढी एकादशीस विठोबाच्या चरणी प्रार्थना केली होती की, केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एनडीएचे सरकार यावे आणि राज्यात महायुतीचे सरकार स्थापन व्हावे. विठ्ठल-रुक्मिणीच्या कृपेने ती प्रार्थना पूर्ण झाली. त्यामुळे या वर्षी मी कृतज्ञतेने पांडुरंगाच्या चरणी महापूजा अर्पण करत आहे.''

त्याचबरोबर त्यांनी राज्याच्या विकासासाठी सुरू असलेल्या योजनांचा उल्लेख केला. ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यात जलसंधारण, स्वच्छता, जेवण, दिंडी अनुदान, वारीसाठी पायाभूत सुविधा, अशा विविध स्तरांवर काम सुरू आहे. मंदिर परिसरात होणाऱ्या गळतीवर नियंत्रण, टोकन प्रणालीमुळे दर्शनासाठी वेळेची बचत, हे महत्त्वाचे बदल होत आहेत,'' असे त्या म्हणाल्या.

राज्य विधानमंडळाचे अधिवेशन सुरू असताना, शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचवण्याचा आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी निर्णायक पावले उचलण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. महिलांसाठी 'स्वयंसिद्धा' मोहिम, बालक व एकल महिलांसाठी सुरक्षात्मक उपक्रम, वंचित विद्यार्थ्यांसाठी महाज्योती, सारथी, बार्टी आदी संस्थांमार्फत सुविधा देण्यावर सरकारचा भर असल्याचेही त्यांनी नमूद केले.

शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा गौरव करताना त्यांनी म्हटले, ''महाराष्ट्रातील समस्त महिलांचे लाडके भाऊ एकनाथ शिंदे साहेब



संकटग्रस्त प्रवाशांसाठी काश्मीर, हिमाचल, महाराष्ट्रात जिथे गरज असेल तिथे धावून जातात. तसेच, त्यांनी 'लाडक्या सुनेचे हुंडा बळी' प्रकरणात स्पष्टपणे शिवसेना महिलांच्या पाठीशी उभी राहील, हे स्पष्ट केले आहे. त्यांच्या या कार्याला गती देणार आहे.''

समारोप करताना डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, ''खरा विश्वास आणि श्रद्धा देव जाणतो. टीका, निंदा, अपप्रचार याकडे दुर्लक्ष करून समाजासाठी निःस्वार्थपणे काम करत राहण्याचा संकल्प मी आज विठोबाच्या चरणी करत आहे.''

या भावपूर्ण आणि सामाजिक संदेशांनी परिपूर्ण पूजाविधीने पुणेकर विठ्ठल भक्तांच्या श्रद्धेला नवीन उर्जा दिली आहे असे डॉ. नीलम गो-हे म्हणाल्या.

# महादेव मुंडेंच्या खूनात वाल्मिक कराडचा हात? बाळा बांगरची पोलिसांकडून तब्बल ६ तास चौकशी, जबाबही नोंदवला

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीडच्या परळी येथील व्यापारी महादेव मुंडे यांचा १८ महिन्यापूर्वी धारदार शस्त्राचे वार करून खून करण्यात आला होता. यात अद्याप एकही आरोपीला अटक झालेली नाही. परंतु आता सरपंच संतोष देशमुख प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराडचे बाळा विजयसिंह बांगर यांचा जबाब काल केज येथे पोलिसांनी नोंदवला असून त्या दिशेने तपास देखील सुरू केला आहे.

दोन दिवसांपूर्वी विजयसिंह बाळा बांगर यांनी पाटोदा येथे पत्रकार परिषद घेत म हादेव मुंडे यांच्या खून प्रकरणात वाल्मिक कराडचा सहभाग असल्याचा गंभीर आरोप केला होता. एवढेच नाही तर महादेव मुंडे यांचं कातडं, हाड आणि रक्त आणून वाल्मिक कराडच्या समोर टेबलवर ठेवल्याचा देखील



खळबळजनक दावा विजयसिंह उर्फ बाळा बांगर यांनी पत्रकार परिषदेमध्ये केला होता. . संतोष देशमुख यांच्या हत्येपूर्वीच तुला एका सरपंचाच्या खुनामध्ये अडकवणार अशी वाल्मिकने फोनवरून मला धमकी दिली होती ,असा दावा बांगर यांनी केला होता.

त्यानंतर महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी बाळा बांगर यांचा जबाब पोलिसांनी नोंदवावा अशी मागणी केली होती. या पत्रकार परिषदेनंतर पोलिसांनीही तातडीने सूत्रे हलवत तब्बल ६ तास चौकशी करत बाळा बांगर यांचा जबाब नोंदवून घेतला असून आता महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणाच्या तपासाला गती मिळाल्याचे दिसून येत आहे.

ज्ञानेश्वरी मुंडेंनी काय केली होती मागणी?

परळीतील मृत व्यापारी महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. बांगर यांचा जबाब घेऊन आरोपींना अटक करण्यात यावी कारण त्यांना आरोपी माहीत आहेत आणि त्यांची फिर्याद देखील घ्यावी.अशी माझी एस पी साहेबांना विनंती आहे त्याचबरोबर एसपी साहेबांना देखील आरोपी निष्पन्न झाले आहेत,पण ते आरोपीची पाठराखण का करत आहेत? तत्कालीन पोलीस निरीक्षक सानप यांचे देखील चौकशी करावी. अशी मागणी महादेव मुंडे यांच्या पत्नी ानेश्वरी मुंडे यांनी केली होती.

### मस्क अमेरिकेचे पुढील राष्ट्राध्यक्ष? केली अमेरिकेच्या राजकारणात भूकंप घडवणारी घोषणा

**मुंबई/प्रतिनिधी :** जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती, टेस्ला आणि स्पेस एक्सबरोबरच 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचे मालक अशी ओळख असलेले अमेरिकी उद्योजक एलोन म स्क यांनी राजकीय क्षेत्रात पहिलं पाऊल ठेवलं आहे. अवघ्या वर्षभरापासून विद्यमान राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यासाठी राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडणुकीमध्ये प्रचाराचं रान पिंजून काढणाऱ्या एलोन मस्क यांनी आता थेट ट्रम्प यांनाच आव्हान देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठीच एलोन मस्क यांनी एका नवीन पक्षाची घोषणा केली आहे. मागील अनेक दशकांपासून द्विपक्षीय राष्ट्राध्यक्षीय निवडणुकीमध्ये ट्रम्प यांच्या या नव्या पक्षाच्या माध्यमातून तिसरा पक्ष सहभागी होणार असल्याची शक्यता असल्याने मस्क यांची नवी घोषणा अमेरिकी राजकारणात भूकंप घडवणारी असल्याचं मानलं जात आहे.

ट्रम्प यांचे निकटवर्तीय

अमेरिकेचे अध्यक्ष आणि एलोन मस्क यांच्यातील बिघडलेल्या संबंधांना आणखी एक वादग्रस्त वळण मिळाले आहे. खरं तर, ट्रम्प यांच्या अगदी जवळचे असलेले एलोन मस्क यांनी एका नवीन राजकीय पक्षाची घोषणा केली आहे. यापूर्वी मस्क यांनी ट्रम्प यांना इशारा दिला होता की जर 'वन बिग ब्युटीफुल बिल' मंजूर झाले तर अमेरिकेत एक नवीन पक्ष स्थापन केला जाईल.

एलोन मस्क यांनी त्यांच्या राजकीय पक्षाचे नाव 'अमेरिका पार्टी' असे ठेवले आहे. मस्क यांनी एक्सवर सांगितले की ट्रम्प यांचे, 'बिग ब्युटीफुल बिल' अमेरिकेला दिवाळखोरीत काढेल. एलोन मस्क यांनी एक्सवर राजकीय पक्षाची घोषणा केली आहे.

एक्सवरुन केली घोषणा

एक्स प्लॅटफॉर्मवर मस्क यांनी आपल्या फॉलोअर्सला नवीन अमेरिकन राजकीय पक्ष स्थापन करावा का? असे विचारल्यानंतर एका दिवसामध्ये, मस्क यांनी शनिवारी एका पोस्टमध्ये घोषणा केली की आज, तुम्हाला तुमचे स्वातंत्र्य परत देण्यासाठी 'अमेरिका पार्टी' स्थापन करण्यात आली आहे.

# रणवीर सिंगचा 'धुरंधर' लूक, छावानंतर अक्षय खन्नाच्या नव्या सिनेमातील भूमिकेने वेधलं लक्ष

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेता रणवीर सिंगच्या आगामी चित्रपटाबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. त्याच्या वाढदिवसानिमित्त त्याच्या नव्या सिनेमाचं नाव, पहिला लूक आणि एक झलक चाहत्यांना पाहायला मिळाली आहे. या नव्या चित्रपटाचं नाव आहे 'धुरंधर'. हा चित्रपट जिओ स्टुडिओज आणि बी६२ स्टुडिओज यांनी संयुक्तपणे तयार केला आहे. रणवीरच्या वाढदिवशी २०२५ मधील सर्वात मोठा आणि अत्यंत अपेक्षित असलेला हा एक्शन-थ्रिलर चित्रपट ''धुरंधर'' याचा टीझर निर्मात्यांनी शेअर केलाय.

'धुरंधर' हा चित्रपट ५ डिसेंबर २०२५ रोजी जगभरातील चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन उरी: द सर्जिकल स्ट्राइक या सुपरहिट चित्रपटाचे दिग्दर्शक आदित्य धर यांनी केले आहे. चित्रपटाच्या पहिल्या झलक टीझर व्हिडिओमध्ये रणवीर सिंगसोबत संजय दत्त आणि अक्षय खन्ना यांचाही दमदार लूक दिसून येतो. या चित्रपटात आर. माधवन आणि अर्जुन रामपाल हे प्रतिभावान अभिनेते देखील आहेत.

'धुरंधर'मध्ये रणवीर सिंगचा आतापर्यंतचा सर्वात भीतीदायक आणि जबरदस्त लूक पाहायला मिळतो. हा लूक पाहून तुम्हाला ''एनिमल'' किंवा ''खिलजी'' हे त्याचे आधीचे लूकसुद्धा फिके वाटतील. टीझरमध्ये रणवीर सिंग एका डायलॉगमध्ये म्हणतो ''आता बिघडवायची वेळ आली आहे.'' तर दुसऱ्या एका जबरदस्त डायलॉगमध्ये तो म्हणतो ''घायल आहे म्हणून अधिक घातक आहे.''

२ मिनिटं ४० सेकंदांचा हा फर्स्ट लूक टीझर अतिशय रॉ, इंटेन्स आणि ॲक्शनने भरलेला आहे. यामध्ये प्रचंड थरार, दमदार संवाद आणि धडाकेबाज ॲक्शन आहे. या टीझरमधील संगीतदेखील लक्षणीय आहे. म्युझिकबाबत बोलायचं झालं तर गायिका जैस्मिन सैंडलस यांचा आवाज ऐकायला मिळतो. विशेष म्हणजे, या गाण्यात न्यू-एज आर्टिस्ट लोकांचं कोलॅबोरेशन आहे. जिओ स्टुडिओज प्रस्तुत आणि बी६२ स्टुडिओ प्रोडक्शनचा हा ''धुरंधर'' चित्रपट आदित्य धर यांनी लिहिलेला, दिग्दर्शित केलेला आणि निर्मितीदेखील त्यांनीच केली आहे. याचे सह-निर्माते ज्योती देशपांडे आणि लोकेश धर आहेत. ही फिल्म अशा अज्ञात पुरुषांच्या कहाण्यांवर आधारित आहे, ज्या आजवर लोकांसमोर कधी आल्या नव्हत्या आणि जे अद्यापही एक रहस्यच आहेत.

# ऐक राज ठाकरे, मी यूपीचा..महाराष्ट्रासाठी रक्त सांडले, २६/११ हल्ल्यावेळी लढलेल्या एक्स कमांडोंने विचारले प्रश्न!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात सध्या भाषेवरून गोंधळ सुरू आहे. मराठी आणि हिंदी घोषणांच्या दरम्यान राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एका रॅलीत मराठी अस्मि तेचा नारा दिला. मराठी बोलणार नाही, असा माज करणाऱ्यांना धडा शिकवा असे आवाहन राज ठाकरेंनी केले. व्यावसायिक सुशील केडियाने राज ठाकरेंना आव्हान दिले आणि त्यानंतर माफी मागितली. यानंतर मी मुंबईत येऊन त्यांचा सर्व अहंकार बाहेर काढेन!, असे आव्हान पूर्णियाचे खासदार राजेश रंजन उर्फ पप्पू यादव यांनी दिलंय. आता एका सैनिकाने राज ठाकरेंना काही प्रश्न विचारलेयत.

२६/११ च्या मुंबई हल्ल्यात कर्तव्य बजावेल्या एक्स मरीन कम ांडो प्रवीण कुमार तेवतिया यांनी राज ठाकरेंना प्रश्न विचारला आहे. त्यांनी एक फोटो शेअर केला आहे आणि लिहिले आहे की, 'मी उत्तर प्रदेशचा आहे. पण जेव्हा मुंबईवर हल्ला झाला तेव्हा मी माझा जीव धोक्यात घालून महाराष्ट्रासाठी रक्त सांडले. त्यावेळी तुमचे योद्धे कुठे होते?'



प्रवीण तेवतिया यांनी सोशल मीडियावर स्वत:चा एक फोटो पोस्ट केला आहे. ज्याम ध्ये ते गणवेशात दिसत आहेत. त्यांच्या बुलेटप्रूफ जॅकेटवर उत्तर प्रदेश लिहिले आहे. त्यांच्या गळ्यात बंदूक लटकलेली आहे. मी ताज हॉटेलमध्ये १५० लोकांचे प्राण वाचवले. त्यावेळी भाषा मध्ये आली नव्हती, राज्य नव्हते. फक्त देश आणि मानवता होती. म्हणून भाषेच्या नावाखाली देशाचे विभाजन करू नका. हास्याची कोणती भाषा नसते, असे प्रवीण म्हणाले.

माध्यमांतील वृत्तानुसार, तेवतिया हे मार्कोस कमांडो होते आणि २६/११ च्या हल्ल्यात त्यांनी त्यांच्या टीमचे नेतृत्व केले. ताज हॉटेलमध्ये अडकलेल्या लोकांना वाचवण्याच्या ऑपरेशनम ध्ये त्यांना ४ गोळ्यांचा सामना करावा लागला आणि तरीही ते खंबीर राहिले. त्यांच्या शौर्यामुळे १५० हून अधिक लोकांचे प्राण वाचले. भाषेच्या नावावरुन वाद सुरू असताना त्यांनी आपला मुद्दा मांडला आणि राज ठाकरे यांना प्रश्न विचारला.म हाराष्ट्रातील शाळांमध्ये हिंदी सक्ती करण्याचा निर्णय मागे घेण्यात आला. यानंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी विजयी मेळावा घेतला.

मराठी न बोलल्याबद्दल एका हिंदू व्यक्तीला मारहाण केल्याचे म्हणत भाजप नेते आणि मंत्री नितेश राणे यांनी मनसेवर टीका



केली. 'टोपी घातलेले' लोक मराठी चांगले बोलतात का? असा प्रश्नही उपस्थित केला. राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या (मनसे) कार्यकर्त्यांनी मुंबईच्या बाहेरील भाईदरमध्ये मराठी बोलण्यास नकार देणाऱ्या दुकानदाराला मारहाण केल्याचा व्हिडिओ व्हायरल होतोय. या पार्श्वभूमीवर राज्यातील वातावरण चांगलच तापलंय.

मराठी बोलणार नाही म्हणणाऱ्या मीरा रोड येथील दुकानदाराला मनसैनिकांनी चोप दिला. यानंतर सुशील केडिया यांनी एक्सवर पोस्ट शेअर करत म्हटलं आहे की, ''राज ठाकरे याची नोंद घ्या की, मागील ३० वर्षांपासून मुंबईत राहत असूनही मला मराठी नीट येत नाही. आता तुमच्या अती गैरवर्तनामुळे मी निश्चित केलं आहे की, जोपर्यंत तुमच्यासारख्या लोकांना मराठी माणसांची काळजी घेण्याचे नाटक करण्याची परवानगी मिळत आहे तोपर्यंत मराठी शिकणार नाही अशी मी प्रतिज्ञा करतो. काय करायचं आहे बोल?''. असे म्हणत राज ठाकरेंना आव्हान दिले. यानंतर त्यांनी राज ठाकरेंची माफी मागितली. दरम्यान त्यांनी आणखी एक ट्विट करत देवेंद्र फडणवीसांचं कौतुक केलंय. जोपर्यंत महाराष्ट्राचे प्रशासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हाती आहे. तोपर्यंत निश्चिंत राहा. कोणावरही कोणत्याही प्रकारचा अत्याचार सहन केला जाणार नाही. न्याय व्यवस्था संपूर्ण सक्रीय राहील. विश्वास हाच प्रेमाचा आधार आहे. प्रेम न्यायाचा आणि न्याय धर्माचा आधार आहे. जय महाराष्ट्र, जय भारत! असे सुशील केडीयांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले.

# सर्वांना निरोगी आयुष्य दे...बळीराजासाठी चांगला पाऊस पडु दे..

## विठुराया चरणी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी घातलं साकडं

### प्रतापरावांची विठ्ठलाचरणी ४३ वी वारी समर्पित


दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** सुंदर ते ध्यान उभे विटेवरी । कर कटावरी ठेवूनियां ।। विठुरायाच्या चरणी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव सपत्नीक नतमस्तक होऊन सर्वांना चांगल आयुष्य ,आरोग्य लाभो आणि बळीराजासाठी चांगला पाऊस पडू दे... असं साकडं विठू चरणी घातलं.

आषाढी एकादशी निमित्त दरवर्षी लाखो भाविक व वारकरी दिंडया श्री.क्षेत्र पंढरपूर येथे जाऊ विठूराया चरणी नतमस्तक होतात. डोळ्याचं पारणं फेडणाऱ्या भक्तीमय सोहळ्यासाठी राज्यातील काना कोपऱ्यातुन लाखो वारकरी विठ्ठल नगरीत विठ्ठला चरणी नतमस्तक होण्यासाठी एकवटतात. आषाढी एकादशी निमित्त केंद्रीय आयुष स्वतंत्र प्रभार तथा आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी श्री.पांडुरंगाचे मनोभावे दर्शन घेतले. देशातील प्रत्येक नागरिकांना चांगले निरोगी आयुष्य मिळूदे... अन्नधान्य पुरवणाऱ्या बळीराजासाठी दमदार पाऊस होऊ दे ...असे साकडेही केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी विठुराया चरणी घातले. यावेळी युवा सेना जिल्हाप्रमुख ऋषि प्रतापराव जाधव उपस्थित होते.

### केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांची विठूराया चरणी सलग ४३ वी वारी

देशाचे केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे खासदार प्रतापराव जाधव हे विठुरायाचे परमभक्त आहेत. कोरोनाचा दोन वर्षाचा कार्यकाळ सोडला तर गेल्या ४३ वर्षापासून ते आषाढी एकादशीला नियमितपणे विठू चरणी नतमस्तक होण्यासाठी जात असतात..प्रत्येक भारतीयांना निरोगी आयुष्य लाभु दे ... बळीराजाला सुखी ठेव ... चांगला पाऊस पडू दे .. असं साकड त्यांनी आपली ४३ वी वारी पूर्ण करताना विठ्ठल चरणी घातलं ...





# नकली लोकांकडून खऱ्या मराठी प्रेमाची अपेक्षा नाही, जयश्री शेळके यांचा आ.संजय गायकवाड यांना टोला

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** गळ्यात नकली वाघाचा, नकली दात घालून फिरणाऱ्या, नकली लोकांकडून खऱ्या महाराष्ट्र आणि मराठी प्रेमाची अपेक्षाच करू शकत नाही.नकली वाघ नखे गळ्यात घालून मिरवणाऱ्यांना असली वाघ होता येत नाही.ठाकरे हा ब्रँड आहे आणि तो महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण देशांना माहित आहे. त्यामुळे नकली वाघ नखे घालून वाघाचा आव आणू नये, असा टोला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सेना पक्षाच्या प्रवक्त्या जयश्री शेळके यांनी आमदार संजय गायकवाड यांना लगावला.





ठाकरे बंधूंचा आवाज मराठी विजयी मेळाव्यावर टीका करताना सत्ताधारी महायुतीमधील भाजप अन् शिवसेना नेत्यांमध्ये स्पर्धा लागली आहे.

बुलढाणा इथले शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांची ठाकरे बंधूंच्या विजयी मेळाव्यावर टीका करताना जीभ घसरली.छत्रपती संभाजी महाराज, ताराराणी, येसूबाई, जिजाऊ यांच्याविषयी बोलताना वादग्रस्त विधान केले. याशिवाय ठाकरे नावाचा ब्रँड राहिला नसल्याचे म्हणताना, बाळासाहेब ठाकरे असतानाच २८८ आमदार निवडून आले असते, असे म्हटले. संजय गायकवाड यांच्या या वादग्रस्त विधानाला, शिवसेना ठाकरे सेना पक्षाच्या प्रवक्त्या जयश्री शेळके यांनी जशास तसे उत्तरं देत दिल्लीची हुजरेगिरी करण्यात किती लाचारीं करायची? याची मर्यादा ओलांडण्याचे काम एकनाथ शिंदे यांच्यासह त्यांच्या आमदारांच्या कृतीतून दिसते. आमदार संजय गायकवाड यांनी शिवराय, संभाजीराजे, जिजाऊ, ताराराणी यांच्याबद्दल जे अपमानस्पद वक्तव्य केले, त्याबद्दल त्यांनी राज्याची माफी मागावी, अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाच्या प्रवक्त्या जयश्री शेळके यांनी केली.

# कोंढवा लैंगिक अत्याचार प्रकरणात धक्कादायक ट्विस्ट; अत्याचाराचा आरोप असलेल्या मुलाला पोलिसांनी अटक केलीच नाही, फक्त नोटीस देऊन सोडलं

**पुणे/प्रतिनिधी :** कोंढव्यातील लैंगिक अत्याचार प्रकरणातील तरुणाला पोलिसांनी अटक न करता नोटीस बजावली असल्याची माहिती समोर आली आहे. संपूर्ण प्रकरण गुंतागुंतीचं असल्यामुळं आणि या फ्रकरणात आरोप करण्यात आलेला तरुण हा तरूणीचा मित्र असल्याचं समोर आल्याने त्याला अटक न करता फक्त नोटीस बजावली आहे. तपासात सहकार्य करणं आणि बोलावल्यानंतर पोलीस ठाण्यात हजर राहण्यासंदर्भात पोलिसांनी ही नोटीस बजावली आहे.

या प्रकरणात नवनवे ट्विस्ट आले होते. तरुणीने लैंगिक अत्याचाराचा बनाव रचला सोबतच तरुण हा तिचाच मित्र असल्याचं समोर आलं होतं. मात्र तरुणीने जबाबात डिलीव्हरी बॉय असा उल्लोख केल्याने या प्रकरणाला पोलिसांनी गांभिर्याने घेऊन पोलिसांनी संपूर्ण सुत्र हलवली होती. स्प्रे मारणे किंवा फोटो काढल्याचं तरुणीने खोट सांगितल्याचं तपासात पुढे आलं होतं. या प्रकरणी तरुणाला शोधण्यासाठी पोलिसांनी ५०० कॅमेरे तपासले होते.त्याचबरोबर पोलिसांच्या तपासात देखील सुरूवातीला गंभीर आरोप करणाऱ्या तरूणीने सर्व गोष्टींचा खुसाला केल्यामुळे सत्य समोर आलं आहे.

संगणक अभियंता तरुणीवरील बलात्कार प्रकरणातील पीडितेने सांगितलेला 'कुरिअर बॉय' हा प्रत्यक्षात तिचाच मित्र असल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. काल (शुक्रवारी, ता ४) या आरोपीला ताब्यात घेण्यात आलं असून सध्या प्रकरणाचा तपास सुरू आहे, अशी माहिती पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी दिली आहे. त्याचबरोबर तरूणीने केलेले काही आरोप देखील खोटे असल्याचं समोर आलं आहे. घटनेच्या दिवशी कोणत्याही प्रकारच्या स्प्रेचा वापर झालेला नाही. त्याचबरोबर, तरुणीच्या मोबाइलमध्ये आढळलेला सेल्फी फोटो सहमतीने काढलेला असून, त्या खाली लिहिलेला मेसेजही तरुणीनेच एडीट करून लिहिल्याची कबुली दिली आहे, असेही पोलिस आयुक्तांनी सांगितले आहे. या घटनेनं खळबळ उडाली होती. मात्र पोलिसांच्या तपासामध्ये प्रकरण पुर्णपणे उलटं फिरल्यानं आता चर्चांना उधाण आलं आहे.

पोलिस आयुक्तांनी या प्रकरणाबाबत दिलेल्या माहितीनुसार, आरोपी तरुण देखील एका नामांकित मल्टीनॅशनल कंपनीत चांगल्या पदावर काम करतो. तो गेल्या वर्षभरापासून तरूणीच्या संपर्कामध्ये होता. दोघांची ओळख समाज मेळाव्यात झालेली होती. त्यांचा एकमेकांशी फोन आणि सोशल मीडियावर सतत संपर्क सुरू होता. तो तिच्या घरी येत-जात असल्याचेही तपासात समोर आले आहे. इतकेच नव्हे; तर तो अनेकदा तिच्या घरी 'फूड डिलिव्हरी ॲप'वरून तिच्यासाठी खाद्यपदार्थ ऑर्डर करून पाठवत होता. घटनेच्या दिवशी तो सायंकाळी सव्वासातच्या सुमारास सोसायटीत येताना दिसला आणि पावणेनऊच्या सुमारास बाहेर पडताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला होता. पोलिसांनी त्याचा फोटो तिला दाखवला असता तरुणीने त्याला ओळखत नसल्याचे सांगितले होते. मात्र, ती काही वेळ स्तब्ध झाली. 'तुम्हाला हा फोटो कुठून मिळाला?' असा प्रश्नही तिने पोलिसांना केला. ओळखत नाही, हे उत्तर देण्यापूर्वी एक ते दोन मिनिटे ती स्तब्ध झाली होती. त्यामुळे पोलिसांचा संशय वाढला. तांत्रिक तपासात स्पष्ट झाले, की आरोपी तरुण तिच्याच बोलावण्यावरून घरी आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलिसांसमोर देखील खऱ्या अर्थाने या गुन्ह्याचा छडा लावण्याचे आव्हान निर्माण झाले होते. दिवस-रात्र ५०० पोलिसांनी तपास करून अखेर तिच्या घरी आलेल्या तरुणाला शोधून काढले. त्यासाठी कोंढव्यातील त्या सोसायटीच्या गेटपासून ते बाणेरपर्यंतच्या परिसरातील तब्बल ५०० सीसीटीव्ही कॅमेरे पोलिसांनी तपासले होते. तरुणीच्या घरी आलेल्या तिच्या मित्राचा फोटो सोसायटीतील कॅमेऱ्यात कैद झाला होता. त्याच फोटोचा दुवा पकडून पोलिसांनी त्या तरुणाला शोधून काढले. त्यानंतर तांत्रिक विश्लेषणाद्वारे ज्या दिवशी तरुणीने आपल्यावर अत्याचार झाल्याचा दावा केला, त्या दिवशी तो तरुण तिच्या सोसायटीत आल्याचे निष्पन्न झाले होते.

# आजच्या तारखेला अख्ख्या भारतात आशिष शेलार साहेब एक नंबरचे वक्ते; बाळा नांदगावकरांचा शेलारांना शालजोडा

**मुंबई/प्रतिनिधी :** हिंदी सक्तीचा वरवंटा दूर केल्यानंतर मराठीच्या विजयी मेळाव्यामध्ये ठाकरे बंधूंनी एकत्रित येण्यासाठी साद घातल्यानंतर राजकीय प्रतिक्रिया सुद्धा उमटल्या आहेत. भाजपकडून खोचक टिपणी होत असतानाच मुंबई भाजप अध्यक्ष मंत्री आशिष शेलार यांनी सुद्धा ठाकरे बंधूंच्या भाषणावर टीका केली आहे. अपूर्ण भाषण असल्याचा टोला सुद्धा शेलार यांनी लगावला. यांच्या टीकेला मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी खोचक शब्दांमध्ये टोला लगावताना शालजोडा लगावला आहे. आजच्या तारखेला अख्ख्या भारतात आशिष शेलार साहेब एक नंबरचे प्रवक्ते असल्याचा शालजोडा बाळा नांदगावकर यांनी लगावला. शेलार यांचं कौतुक असल्याचेही ते म्हणाले. तुमचा पक्ष काय सामाजिक संस्था आहे का? अशी विचारणा सुद्धा बाळा नंदगावकर यांनी केली. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेले टीकेला सुद्धा बाळा नांदगावकर यांनी प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले की त्यांना सगळेच माहीत आहे.



काल झालेल्या मेळाव्यावर बोलताना बाळा नांदगावकर यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की कालचा दिवस शब्दांमध्ये मांडता येणार नाही. ठाकरे कुटुंबानं महाराष्ट्राला, आम्हाला बाळासाहेबांना आणि भाजपला खूप काही दिलं आहे. संपूर्ण परिवार एकत्र आल्याचा आनंद असल्याचे बाळा नांदगावकर म्हणाले.

काय म्हणाले आशिष शेलार?

भाजप नेते आमदार आशिष शेलार यांनी ठाकरे बंधूंच्या युतीवर बोलताना म्हटले आहे की, दोघांच्याही भाषणात अप्रामाणिकपणा होता. उद्धव यांच्या भाषणात तडफफड दिसत होती. दोघांनीही देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानायला पाहिजे होते. मेळाव्यातील 'म' हा महानरपालिकेचा असल्याची टीका देखील शेलार यांनी यावेळी बोलताना केली''. उद्धव ठाकरे यांच्या भाषणात सत्ता गेली याचं भावना होत्या. त्यांचा हेतू अप्रामाणिक आणि राजकीय आहे, असे शेलार म्हणाले. रस्तावर गोट्या खेळा, असं म्हणत शेलार यांनी राज ठाकरेंच्या रस्तावर सत्ता आमची आहे, या वक्तव्याची खिल्ली उडवली.

# शेतकरी अंबादास पवार यांच्यावर मदतीचा ओघ

## सहकारमंत्र्यांनी भरले शेतकऱ्याचे थकीत कर्ज : आ. संजय गायकवाड यांची भरीव मदत

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बैलजोडी घेण्यास पैसे नसल्याने अंबादास पवार यांनी स्वत:ला औताला जोपून घेतल्याचा विषय पावसाळी अधिवेशनात चर्चिला गेला. त्यानंतर शेतकरी अंबादास पवार यांच्या मदतीसाठी अनेकांनी पुढाकार घेतला आहे. सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी पवार यांच्या कर्जाची भरणा केल्याचे पत्र शनिवारी दिले. तसेच बुलडाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी पवार कुटुंबीयांची भेट घेत मदतीचा हात दिला.अंबादास पवार यांच्या कुटुंबाला सहा दिवसांपासून अनेक जण भेटी देत आहेत. काहींनी रोख मदत तर काही जणांनी त्यांच्या नातवाच्या शिक्षणासाठी पुढाकार घेतला. या जिव्हाळ्यामुळे पवार यांना पुन्हा उमेद आली. बैलजोडी घेण्यास पैसे नसल्याने अंबादास पवार यांनी स्वत:ला औताला जोडून घेतल्याचा विषय पावसाळी अधिवेशनात चर्चिला गेला होता. त्यावेळी सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी दूरध्वनीवर संवाद साधत सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. पाटील यांनी पवार यांच्या घरी जाऊन चौकशी केली. सर्व कर्जाचा भरणा करत सातबारा कोरा केला.यावेळी उपविभागीय अधिकारी शिवनंदा लंगडापुरे, गटविकास अधिकारी शेळके, कृषी अधिकारी सचिन बावगे आदींची उपस्थिती होती.यावेळी सहकार मंत्री पाटील यांनी शेतकयाच्या मुलाला शासकीय निकषानुसार कोणत्याही कार्यक्षेत्रात समाविष्ट करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आश्वासन दिले.





### पाय धुवून केले पूजन

बुलडाणा येथील आमदार संजय गायकवाड यांनी अंबादास पवार यांना एक बैलजोडी, ५० हजार रुपये रोख, वर्षभर पुरेल एवढा किराणा, धान्य व त्या शेतकरी दांपत्याला आहेर करीत पाय धुवून त्यांचे पूजन केले. नाशिक जिल्हा परिषदेचे माजी सभापती रवींद्र देवरे यांनी या दांपत्याला ५० हजार रुपयांची रोख मदत दिली. आमदार संजय गायकवाड यांनी या दांपत्याचे पाय धुवून पूजन केली त्यावेळी मुक्ताबाई पवार यांना अश्रू अनावर झाले. या अश्रुंची आज फुले झाली असून, कष्टाचा पुरेपूर सन्मान झाल्याची भावना पवार दांपत्याने बोलून दाखवली.

## विविध वृत्त...


### भारत प्राथमिक मराठी शाळेत आषाढी एकादशी साजरी



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** येथील भारत प्राथमिक मराठी शाळेत ५ जुलै रोजी आषाढी एकादशी उत्साहात साजरी करण्यात आली. शाळेच्या अध्यक्षा जयश्रीताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी एकादशी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका किरणताई दुबे यांच्या हस्ते पालखीचे व विठुरायाचे पूजन करण्यात आले. त्यांनतर विद्यार्थ्यांनी पारंपारिक वारकरी वेषभूषा करून व डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन उत्साहात पायी दिंडी काढली. ज्ञानबा तुकारामचा जयघोष करत मोठ्या जल्लोषात सर्व विद्यार्थी दिंडीमध्ये सहभागी झाले. बाल वारकऱ्यांनी वारकरी संप्रदायाचे दर्शन घडवित हातात टाळ आणि डोक्यावर तुळस, गळ्यात तुळशीच्या माळा घालून हरी नामाचा गजर केला व भजन, अभंग, ओव्या व फुगड्याचा मनमुराद आनंद लुटला. अवघी शाळाच दिंडी सोहळ्यात भक्तीरसात तल्लीन झाल्याची पाहायला मिळाली. याप्रसंगी मुख्याध्यापिका किरण दुबे यांनी महाराष्ट्रातील संत परंपरा व त्यांनी दिलेल्या सद्विचार-सद्वर्तनाच्या शिकवणुकीचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. वृक्षारोपण व पसायदानाने दिंडी सोहळ्याची सांगता झाली.

### वाढदिवसानिमित्त संतोषी माता देवस्थान च्या प्रांगणामध्ये फळ वाटप



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** बीबी येथील पत्रकार भागवत आटोळे यांचे लहान बंधू आनंद आटोळे व चिरंजीव मयूर भागवत आटोळे या दोघांनी आपला वाढदिवस एक आगळावेगळा साजरा केला व्यर्थ पैसा खर्च न करता आषाढी एकादशी चे अवचित साधून आज दिनांक ६ जुलै रोजी येथील विठ्ठल रुक्माई च्या मंदिरासमोर भावी भक्तांना फळ वाटप केले यावेळी प्रामुख्याने गावातील प्रतिष्ठित नागरिक तंटामुक्ती अध्यक्ष विठ्ठल पाटील आटोळे सरपंच पुत्र दीपक गुलमोहर प्राध्यापक अरविंद चव्हाण सर बाळासाहेब कुलकर्णी ह भ प गोपाल टेके महाराज लक्ष्मण नरवाडे श्रीमत आटोळे अशोक मिरे धनराज मंत्री लक्ष्मण महाजन हिम्मतराव गरकळ व तसेच मित्रपरिवार महिला वर्ग बालगोपाळ यांनी या फराळाचा स्वाद घेतला

### गुजरात काय पाकिस्तानचा प्रांत नाही; केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव प्रतिक्रिया

**बुलडाणा/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुण्यात एका सार्वजनिक कार्यक्रमात 'जय गुजरात' अशी घोषणा केली होती. यावर प्रतिक्रिया देताना केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी एकनाथ शिंदे यांचे पाठराखण करीत गुजरात हा काय पाकिस्तानचा प्रांत नाही. तो भारत देशाचा एक प्रांत आहे महाराष्ट्राच्या शेजारच्या राज्य आहे आणि विशेष म्हणजे त्यांचीही काही काळ मुंबई ही गुजरातची राजधानी होती. असे अशी प्रतिक्रिया केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत पुणे येथे पार पडलेल्या जयराज स्पोर्ट्स अँड कन्व्हेन्शन सेंटरच्या उद्घाटन समारंभातील भाषणादरम्यान, एकनाथ शिंदे यांनी ''जय हिंद, जय महाराष्ट्र,जय गुजरात'' असा नारा दिला. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या. दरम्यान शिवसेना शिंदे गटाचे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी माध्यमांशी बोलताना त्यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जय गुजरात असे म्हटले असले तरी, गुजरात काय पाकिस्तानचा प्रांत नाही. तो भारताचा एक प्रांत आहे. मुंबईतही बहुतांश गुजराती लोक राहतात. अशी प्रतिक्रिया माध्यमांशी बोलताना देत त्यांच्या वक्तव्याचे पाठरखण केले.